# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/ १०२४/२०२५-२६ दि.०६ /१०/२०२५

प्रति,

**जनसंपर्क अधिकारी,**

जनसंपर्क विभाग

मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.06/10/2025

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) कडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) **जांभुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील जलाशय () येथे बारवी गुरुत्ववाहीनी क्र.१, २, ३ वर वाहीन्यांचे उन्नतीकरण व तातडीचे देखभाल दुरुस्तीचे काम करण्याकरीता** २४ तासांचा शटडाऊन घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा **गुरुवार दि.०९/१०/२०२५ रोजी रात्री १२:०० वा. ते शुक्रवार दि.१०/१०/२०२५ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यत (एकुण २४ तास) पूर्णपणे बंद राहील.** तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका